# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. १८/०१/२०११**

आज मंगळवार दि. १८/०१/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १० दि. ०७/०१/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | पाटील मिलन गोविंदराव | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २२) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २४) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २५) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २८) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २९) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३०) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३१) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३२) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३३) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३४) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३५) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३६) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३७) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३८) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३९) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४०) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४१) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४३) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४४) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४५) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४६) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४७) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४८) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४९) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५०) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५१) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५३) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५४) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५५) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५६) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५७) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५८) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६१) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६२) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६३) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६४) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६५) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६६) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६७) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६८) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| ३) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ५) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ८) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ९) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| १०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ११) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रीय गीतासाठी जागेवर उभे राहायचे आहे.

(“वंदे मातरम” या राष्ट्रीय गीताने सभेला सुरूवात करण्यात आली.)

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मा. महापौर साहेब, आज जो अजेंडा दिला गेलेला आहे, मागची मा. महासभा ही तहकुब झाली होती आणि त्याबद्दल सचिवांनी सर्टीफाइड कॉपीसुध्दा दिलेली आहे. ती तहकुब सभा न लावता आपण नवीन सभा आयोजित केलेली आहे. कुठल्या नियमानुसार, कुठल्या कायद्यानुसार आणि तहकुब सभा गेली कुठे?

**मा. महापौर :-**

तुम्ही परवानगी घेतली का?

**नरेंद्र मेहता :-**

कसली परवानगी?

**मा. महापौर :-**

तुम्हाला बोलायला अलाऊड केले नाही. त्याच्या आधी बोलायला लागले.

**नरेंद्र मेहता :-**

इकडे आत्ता परवानगीसारखे चालत नाही. इकडे कायद्याचेच पालन होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

परवानगीचा काय प्रश्न आला? मागच्या मिटींगमध्ये तुम्ही लोकांनी सांगितले की, आमचा प्रस्ताव पुढच्या मा. महासभेत नवीन येणार. तुम्ही तो डेलिब्रेटली फेटाळला. मी माझे पत्र दिलेले आहे. परवानग्या घ्यायची गरज नाही. ही लोकशाही आहे. तुम्हा आम्हाला कशाला परवानगी द्याल. मिटींग तहकुब केली. अर्धी मिटींग अपूर्ण राहिली. पूर्ण करताना आमची परवानगी घेतली का?

**मा. महापौर :-**

सभेला शिस्त नको का? असे म्हणून कसे चालेल?

**मिलन म्हात्रे :-**

कसली शिस्त आली आहे? अर्धवट राहिलेली मिटींग का पुर्ण करत नाही? त्याला अडचण काय आहे? तुम्ही मागच्या मिटींगमध्ये जी आश्वासने दिली ती का घेतली नाहीत? ही शिस्त आहे का? या संपूर्ण प्रोसिडींगला आमचा विरोध आहे. या नवीन मिटींगला विरोध आहे. तुम्ही जे प्रमोशनचे प्रस्ताव घेतले, जंम्पींग प्रमोशन द्यायला तुम्हाला अधिकार आहेत का? आणि या बेकायदेशिर, मग तुम्ही आमचे मतदान का घेता? किती प्रस्ताव बाकी आहेत हे जरा बाजुला बसलेल्या अधिकाऱ्यांना तुम्ही विचारा. जंम्पींग प्रमोशनला तुम्ही बेकायदेशिर आमची मंजुरी घेता. जबाबदार आम्ही. वसुली भलत्या लोकांनी करायची आणि मतदान आम्ही करायचे का? आणि मग त्या अधिकाऱ्यांनी ती पत्र कोर्टात पाठवायची. साध्या प्युनला क्लार्क करताना जंम्पींग प्रमोशन देत नाहीत. इकडे अधिकाऱ्यांची पदे नाहीत. डिग्री नसताना तुम्ही या लोकांना प्रमोशन देता. या सगळ्या तुमच्या पापामध्ये तुम्ही आम्हाला भागीदार करता का?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यांना समज द्यावी.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे की, सदरची मिटींग रद्द करा. माझे अनुमोदन आहे. मिटींग रद्द करा.

**मिलन पाटील :-**

श्री. मिलन म्हात्रे साहेबांना एक समज द्यावी. कारण मा. महापौर पद हे आज आपल्या शहराकरिता सर्वश्रेष्ठ आहे. त्यांच्याशी सौजन्याची भाषा वापरावी.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, आज दिनांक १८ रोजी महाराष्ट्राचे मा. उपमुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये........

**मिलन म्हात्रे :-**

तुमची मिटींग कुठे आहे ते आम्हाला देणं घेणं नाही. तुम्ही ही सभा रद्द करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, सभागृह नेता बोलतात. मागे सदस्य बोलतात, गोंधळ घालतात ते बोलून झाल्यानंतर सभागृह नेत्यांना बोलू द्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**अनिल सावंत :-**

त्यांना विषयपत्रिका वाचू द्या.

**नरेंद्र मेहता :-**

विषयपत्रिकेचा संबंध कुठे येतो?

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. १८/०१/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. १०, दि. ०७/०१/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पहिले १८/१२ ची मिटींग पुर्ण करा.

**प्रभात पाटील :-**

मा. उपमुख्यमंत्री यांच्या दालनात आज महत्वाची बैठक असल्याकारणाने मा. महापौर, मा. आयुक्त यांना जायचे असल्याने आजची सभा तहकुब करण्यांत यावी असा मी ठराव मांडते.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, एक विषय समजून घ्या. तुम्ही सभा रद्द करा. आमची त्याला सहमती आहे. मा. उपमुख्यमंत्र्यांकडे महत्वाचा विषय आहे. आपण जावे. आमचे मत असे आहे की, सचिवांनी खुलासा करावा की, मागची सभा तहकुब झाली होती की, रद्द झाली होती?

**मा. महापौर :-**

तुम्ही अडीच वर्षे मा. महापौर होते. तुम्हाला समजण्याची गरज नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**ठराव क्रं. ७२ :-**

आज दि. १८/०१/२०११ रोजी महाराष्ट्राचे मा. उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांजकडे दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या घनकचरा, पाणी पुरवठा व इतर ज्वलंत प्रश्नांवर बैठक आयोजित केलेली आहे. या बैठकीत महानगरपालिकेचे मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याने आजची सभा तहकुब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.४४ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**